**नि.दि.दा. क्र.१९/२०२१.**
**नि.क्र.५३**

**प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे उलटतपास विद्वान वकील श्री. बी.पी. वर्मा यांचेमार्फतः–**

२१. मला एक भाऊ आहे, त्याचे नाव प्रणव असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा ते शेवगाव या रोडवर कुकाणा शिवारात रोडच्या दोन्ही बाजुने अभंग कुटुंबियांच्या मिळकती आहेत. सर्व दावा मिळकती या माझ्या वडिलांना वारसा हक्काने मिळालेल्या आहेत. माझी आई या दाव्यात पक्षकार नाही. प्रतिवादी क्र.१५ रविंद्र यांच्या विरोधात आमची कुठलीही मागणी नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १८/०१/२०१६ रोजी, गट नंबर ९०/१ मधील २१ आर जमीन माझे वडिल गोरक्षनाथ यांनी अजित मंडलिक यांना विक्री केली व ताबा दिला. मला लिहिता व वाचता येते. मी तो खरेदीखताचा दस्त पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर विक्री केलेली २१ आर जमीन ही पुर्व–पश्चिम १०० फुट व दक्षिण–उत्तर २३० फुट अशी होती. हे म्हणणे खरे आहे की, अजित मंडलिक यांना जी २१ आर जमीन विक्री केली होती त्यामध्ये दक्षिण उत्तर २३० फुट जी जमीन आहे त्यातील काही भागावर आमचा बंगला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १८/०७/२०१६ रोजी सदर खरेदीखत झाल्यानंतर माझे वडिल गोरक्षनाथ व अजित मंडलिक यांच्यात चुकदुरुस्तीचा दस्त करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, चुक दुरुस्तीच्या दस्तानुसार अजित मंडलिक यांना गट नंबर ९०/१ मधील पुर्व–पश्चिम १२० फुट व दक्षिण–उत्तर १९१ असे क्षेत्रफळ जमीन दिली. हे मला माहित नाही की, नेवासा ते शेवगाव रोडच्या मध्यापासुन ६५ फुट अंतर सोडून अजित मंडलिक यांना २१ आर जमीन क्षेत्रफळ देण्यात आले.

२२. मला लांबी रुंदीबाबत कळते. हे म्हणणे खरे आहे की, १०८९ फुट क्षेत्रफळ

जमीन म्हणजे एक गुंठा. हे म्हणणे खरे आहे की, चुक दुरुस्तीच्या दस्तानुसार अजित मंडलिक यांना जी जमीन विक्री केली होती ती आज रोजी त्यांच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, अजित मंडलिक यांनी खरेदी केलेली मिळकत, प्रतिवादी क्र.१ भारत, प्रतिवादी क्र.२ गायत्री, प्रतिवादी क्र.४ नितीन व त्याची पत्नी राजनंदिनी यांना विक्री केली. हे मला माहित नाही की, ते खरेदीखत दिनांक १०/०४/२०१९ रोजी झालेले आहे. हे मला माहित नाही की, राजनंदिनी हिने तिच्या नावावरील पुर्वेकडील क्षेत्रफळ प्रतिवादी क्र.३ गुरुनाम यांना विक्री केले. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदर २१ आर जमीन खरेदी केल्यानंतर आपल्या–आपल्या हिश्याच्या दिशा ठरुन घेतल्या.

**२३.** हे मला माहिती आहे की, प्रतिवादी क्र.३ यांनी त्याच्या हिश्याच्या मिळकतीत कपडयाचे दुकानाचे बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी प्रतिवादी क्र.३ यांचे दुकान चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ भरत याचे ४ आर क्षेत्रफळ जागेत कपडयाचे दुकान चालु आहे. हे मला माहित नाही की, सदर प्रतिवादी क्र.१ भारत व प्रतिवादी क्र.३ गुरुनाम यांच्या मालकिच्या दुकानामध्ये, प्रतिवादी क्र.२ गायत्री व प्रतिवादी क्र.४ नितीन यांच्या मालकिचे १० आर क्षेत्रफळ जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ गुरुनाम यांच्या दुकानाला लागुन आमचा बंगला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ गुरुनाम यांच्या दुकानाच्या पुर्व बाजुने आमच्या बंगल्यात जाण्याकरीता रस्ता आहे.

**२४.** हे मला माहित नाही की, सदर २१ आर विक्री केलेल्या जमिनीच्या पश्चिम बाजुची ४० आर जमीन ही माझे वडिल गोरक्षनाथ यांनी श्री. चेडे यांना विक्री केली. हे मला माहित नाही की, सदर ४० आर पैकी २० आर जमीन ही श्री. चेडे यांनी समाईकरित्या,

प्रतिवादी क्र.७ ते १३ यांना विक्री केली. हे मला माहित नाही की, उर्वरीत २० आर जमीन ही श्री. चेडे यांनी प्रतिवादी क्र.५ व ६ यांना विक्री केली.

**न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

SUNIL NAGORAO BHOSLE

Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2025.01.30 11:36:44 +0530

दिनांक – २८/०१/२०२५

**(एस.एन. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
नेवासा